**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०६०                दि.२२/०९/२०१९**

## बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर
## गांजा विक्री करणाऱ्या सराईतास बंडगार्डन पोलीसांनी सापळा रचुन गांजासह केले जेरबंद

एक गांजा विक्रेता हा आळंदी भागातुन गांजा खरेदी करुन बंडगार्डन पोलीस स्टेशनचे हद्दीतील ताडीवालारोड परीसरात विक्री करीत असलेबाबतची खात्रीशीर माहीती बंडगार्डन पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांना ०७ दिवसापुर्वी मिळाली होती. मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.तांबे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक संदिप जमदाडे व स्टाफ ताडीवालारोड परीसरात लक्ष ठेवुन होते.

आज दि.२१/०९/२०१९ रोजी मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरुन ताडीवाला रोड भागातील सजनाबाई भंडारी शाळेजवळ ताडीवालारोड येथे गांजा तस्कर आदिलशाह मैनोद्दीन शेख वय ३९ वर्ष, रा. इनाम मस्जिदजवळ, साई मंदीराजवळ, प्रायव्हेटरोड, ताडीवाला रोड, पुणे यास गांजाची विक्री करीत असताना रंगेहाथ पकडुन त्याचेकडुन ४५० ग्रॅम गांजा,टु व्हीलर गाडी व रोख रक्कम असा ६८,८५०/- रु.चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन त्याचेविरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.३८०/२०१९ एनडीपीएस ॲक्ट कलम २०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गांजाची तस्करी करणाऱ्या आळंदी येथील आरोपीची माहीती घेवुन त्याचा शोध घेण्यासाठी पोलीसांचे पथक तयार करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई पश्चिम प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त श्री. संजय शिंदे, परिमंडळ-२ चे पोलीस उप-आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे, लष्कर विभागाचे सहा.पोलीस आयुक्त श्री. रविंद्र रसाळ, यांचे मार्गदर्शनाखाली बंडगार्डन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल तांबे, तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदिप जमदाडे, पोलीस कर्मचारी संतोष पागार, हरीष मोरे, नवनाथ डांगे, कैलास डुकरे, रुपेश पिसाळ, निखिल जाधव, श्रीधर सानप, किरण तळेकर, गौरव उभे व सागर जगताप यांनी केली.